# * प्रकरण पाचवे *

## महात्मा गांधी व हिंदु-मुस्लीम ऐक्य - टीकात्मक अभ्यास

# * प्रकरण पाचवे *

# महात्मा गांधी व हिंदु-मुस्लीम ऐक्य - टीकात्मक अभ्यास

प्रस्तावना :

इ. स. १९४६ ते १९४७ या दरम्यान हिंदू–मुस्लिम प्रश्नाच्या विषयाचा विश्लेषणात्मक व चिकित्सक अभ्यास केल्यानंतर गेल्या १०० वर्षांच्या हिंदू–मुस्लिम प्रश्नांचे विविधांगी दृष्टीकोन नजरेसमोर येतात. कॅबिनेट मिशनच्या अपयशानंतर घटनात्मक प्रश्न सोडविण्यासाठी लॉर्ड वेव्हेल यांनी अंतरिम सरकारची स्थापना केली. परंतु प्रतिगामी राजकीय पुढाऱ्यांनी तडजोडीचा मार्ग न स्वीकारता धर्म आणि राष्ट्रवाद याच्या संकलित रूपाने जमातवादाचे विकृत स्वरूप मांडून आक्रमक भूमिका स्वीकारली. अंतरिम सरकारमध्ये हिंदू–मुस्लिम प्रतिनिधी निवडण्याची स्वायत्तता कॉंग्रेस आणि लीगला होती. परंतु मुस्लिम प्रतिनिधी निवडण्याचा हक्क फक्त मुस्लिम लीगलाच आहे. असा दावा मुस्लिम लीगने केला. कॉंग्रेस धर्मभेदातीत पक्ष असल्याने तो मुस्लिम प्रतिनिधी निवडण्याचा हकक सोडून देण्यास तयार नव्हते. या विरोधाच्या कात्रीत लीगने सरकारशी सहकार्य न करण्याचा ठराव करून 'प्रत्यक्ष कृती' च्या नावाने जो मार्ग चोखाळला त्याचा परिणाम नोआखली, कलकत्ता, बिहार, पंजाब व दिल्ली या प्रांतात सबंध वर्षभर लोकांची हत्या, बलात्कार, सार्वजनिक विध्वंस यात झाला. त्यातून भारताची फाळणी झाली. अशाप्रसंगी महात्मा गांधींनी मानवता व करूणेला हाक देवून हिंदू–मुस्लिम लोकांमध्ये सामंजस्य व शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रांतो–प्रांती अहिंसक संदेश देत शांती प्रस्थापनेचा प्रयत्न केला.

भारताच्या फाळणीप्रसंगी जमातवादाचा प्रश्न सोडविणे हा यक्ष प्रश्न होता. कारण हिंदु–मुस्लीम एकतेशिवाय फाळणी टाळणे शक्य नाही अशी गांधीजींची भूमिका होती. नोआखली, बिहार, कलकत्ता, दिल्ली या चार प्रांतात महात्मा गांधीजी सत्याग्रहाचे अभिनव प्रयोग करून हिंदू–मुस्लिम ऐक्य प्रस्थापित करण्याचे प्रयत्न करीत होते. याप्रसंगी काही सकारात्मक वातावरण तयार होत होते. परंतु लोकप्रतिनिधी सरकार म्हणून जे कार्य करणे याप्रसंगी अपेक्षित होते ते कार्य होवू शकले नाही. यामुळे असुरक्षिततेची आग भडकत राहिली. परिणामी जामतवादाच्या या अग्नीकुंडात महात्मा गांधींसारख्या थोर पुरूषाचा अंत झाला.

## हिंदु – मुस्लीम प्रश्नाचे स्वरूप :

१९४० ते १९४६ या दरम्यानची भारतातील स्वातंत्र्य चळवळ विविधांगांनी नागमोडी वळण घेत राहिली. १९४० मध्ये लाहोर येथे बॅ. जीना यांनी स्वतंत्र पाकिस्तानची घोषणा करून आक्रमक भूमिका मांडण्यास सुरूवात केली. कॉंग्रेस विधायक विरोधाची भूमिका घेत राहिल्याने ब्रिटीश सरकारने १९४२ मध्ये क्रिप्स योजना अंमलात आणली. परंतु त्यातील असमाधानकारक धोरणांमुळे ही योजना यशस्वी झाली नाही. १९४२ साली 'चले जाव' चळवळीच्या माध्यमातून गांधीजींनी ब्रिटीशांना आव्हान दिले. परिणामी एकसंघ भारतीय समाज प्रथमच मोठया संख्येने ब्रिटीश विरोधी भूमिका घेवू लागला.

भारतीयांची वाढती प्रातिनिधीक लोकशाहीची मागणी दिवसेंदिवस लोकप्रिय ठरत होती. याच दरम्यान मुस्लिम लीगने ब्रिटीशांच्या आशिर्वादाने कॉंग्रेसविरोधी धोरण अवलंबिले. १९४२ ची 'चले जाव' चळवळ दडपण्यासाठी ब्रिटीशांनी दडपशाहीचे धोरण अवलंबून राष्ट्रीय नेत्यांना अटक करून स्थानबध्द केले. १९४५ मध्ये दुसऱ्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर इंग्लंडमध्ये सत्ताबदल होवून मजुर

पक्ष सत्तेवर आला. त्यांनी पुन्हा एकदा भारतामध्ये घटनात्मक व्यवस्था निर्माण करण्यासाठी कॅबिनेट मिशन भारतात पाठविले. या मिशनच्या शिफारसीनुसार अ, ब, क असे गट बनणार होते. या गटात सामील होणे ऐच्छिक आहे असे कॉंग्रेसचे म्हणणे होते तर त्यात सामील होणे सक्तीचे आहे, असे लीगचे म्हणणे होते. पण मुस्लिम लीगला गटांच्या माध्यमातून पाकिस्तान निर्माण करावयाचे होते.

१९४६ मध्ये लॉर्ड वेव्हेलने पुन्हा एकदा अंतरिम सरकारच्या माध्यमातून भारतीयांत घटनात्मक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. परंतु मुस्लिम प्रतिनिधी निवडण्याच्या वादावरून लीगने सरकारशी सहकार्य न करता 'प्रत्यक्ष कृती' चा मार्ग अवलंबिला. प्रत्यक्ष कृती दिन पाळण्याच्या माध्यमातून कलकत्ता, नोआखली प्रांतात निष्पाप हिंदू लोकांची हत्त्या, लूट, बलात्कार, सार्वजनिक विध्वस मोठया प्रमाणात झाल्यामुळे जमातवाद फोफावला. या प्रतिकियास्वरूपी बिहारमधील हिंदूंनी मुस्लिमांची कत्तल करण्यास सुरूवात केली. अशा प्रसंगी ब्रिटीश सरकार मुस्लिम लीगच्या कृतीमुळे सबंध परिस्थिती निर्माण झाल्याची उघड भाषा करण्याऐवजी तत्त्वज्ञानात्मक भाष्य करीत राहिले. या भयावह परिस्थितीच्या परिणामी वेव्हेल यांच्या सहकार्याने मुस्लिम लीग सरकारमध्ये सामील झाली. परंतु त्यांचे धोरण मात्र कॉंग्रेसविरोधीच राहिले. त्यांनी आंत राहून सरकार कमजोर करण्याचे प्रयत्न सुरू केले. कॉंग्रेस पुढाऱ्यांनी अशा गढूळ राजकीय वातावरणात देशाच्या फाळणीला शेवटी नाईलाजाने मान्यता दिली. कारण देश आतापर्यंत जमातवादाच्या अनेक अग्नीदिव्यातून गेल्याने पुन्हा ती कसोटी पाहण्याची मानसिक तयारी त्यांची नव्हती.

भारताच्या फाळणीला गांधीजींचा शेवटपर्यंत विरोध राहिला. पण मुस्लिम लीग व काही प्रतिगामी कॉंग्रेस पुढाऱ्यांनी सत्तालालसेपोटी फाळणी स्वीकारली.

यावरून भारताच्या फाळणीचे खापर महात्मा गांधींवर फोडणे म्हणजे इतिहासाचा विपर्यास आहे. महात्मा गांधींनी भारताची फाळणी टाळण्यासाठी नोआखली, बिहार, कलकत्ता, दिल्ली येथील जमातवादी दंगे शमविण्यासाठी प्रत्यक्ष घटनास्थळी जावून शांतता स्थापित करण्याचे प्रयोग करू लागले. काही काळ शांतता स्थापित झाल्याचा भास होता होता. परंतु पुन्हा नव्याने जमातवादी दंगे वाढत होते. कारण काही सुप्त घटना जमातवाद वाढविण्यास हातभार लावीत होत्या. किंबहुना प्रातिनिधिक सरकार म्हणून जे कार्य बिहार, नोआखली येथे होणे आवश्यक होते ते घडले नाही. तरीही त्या भागात गांधी मोठया प्रमाणात शांतता स्थापन करण्यात यशस्वी ठरले.

मुस्लिम लीगच्या प्रत्यक्ष कृतीने ज्या दंगली सुरू झाल्या त्यामुळे भारतातील राजकीय वातावरण गढूळ बनले. प्रातिनिधीक लोकशाहीची मागणी आणि जमातवाद एकत्र नांदणे केंव्हाही शक्य नव्हते. एकीकडे ब्रिटीश सरकार भारतीयांच्या वाढत्या आंदोलनांमुळे माघार घेण्याची चिन्हं दिसत होती, तर दुसऱ्या बाजूला लीग हा पक्ष अपेक्षित पाकिस्तान मिळवियासाठी धर्माश्रयाखाली स्वतंत्र पाकिस्तानची मागणी करीत होता. जेंव्हा ब्रिटीश भारत सोडून जाणार ही गोष्ट नक्की झाली तेंव्हा लीगने आक्रमकपणा वाढविला. कारण ब्रिटीशांच्या अनुपस्थितीत आपल्याला स्वतंत्र पाकिस्तान मिळणार नाही, अशी त्यांची खात्री होती. त्यामुळे ब्रिटीश भारत देश सोडून जाण्याअगोदर आपली अपेक्षित विभागणी करूनच ब्रिटीशांनी जावे ही लीगची हटवादी भूमिका एकसंघ हिंदुस्तान निर्माण होण्यात अडसर ठरली.

दुसऱ्या बाजूला ब्रिटीशांच्या वतीने असे सांगण्यात येते की, आम्ही अल्पसंख्य मुसलमान बहुसंख्य पक्षाच्या हाती देवून त्यांच्या हितास दगा देवू

शकणार नव्हते. पण आज जो भारत आणि पाकिस्तान राष्ट्र त्यांनी निर्माण केला आहे, त्यातील हिंदू, मुस्लिम व शीख अल्पसंख्यांक दोन्ही देशांत आहेत. त्यांच्या हक्क रक्षणाची तरी त्यांनी कोणती हमी दिली होती? देशाचे दोन तुकडे केल्याने अल्पसंख्यांकांच्या हितरक्षणाचा प्रश्न सुटु शकेल ही कल्पना भ्रामक ठरली असू, धर्मावर पृथक राष्ट्रभावना निर्माण करण्याने हा प्रश्न सुटू शकत नाही, हेच मत अखेरीस अनुभवाने खरे ठरले आहे.

ब्रिटीशांच्या वतीने आणखी एक युक्तिवाद करण्यात येतो, तो म्हणजे मुसलमानांना ब्रिटीश सरकारने वारंवार दिलेली अभिवचने पाळण्यासाठी त्यांना फाळणी करणे भाग पडले. या युक्तिवादातही फारसा अर्थ नाही. कारण त्यांनी अशा प्रकारची अभिवनचे हिंदी संस्थानिकांनाही निरनिराळया वेळी दिली होती. पण अखेरीस भारत देश सोडून जाताना ही सर्व अभिवचने गुंडाळून ठेवून त्यांनी भारत आणि पाकिस्तान राष्ट्र निर्माण केले.

उपरोक्त आशयावरून स्पष्ट होते की, भारताच्या फाळणीस ब्रिटीशांचे साम्राज्यवादी धोरण, मुस्लिम लीगची आक्रमक भूमिका आणि काही प्रतिगामी कॉंग्रेस व हिंदू पुढारी जबाबदार आहेत. महात्मा गांधींचा यांत कोणताही संबंध नाही.

## महात्मा गांधींच्या दंगली शमविण्याच्या पध्दती, वैशिष्टये व मर्यादा :

भारतीय स्वातंत्र्याच्या लढयात गांधींनी १९१९ साली पदार्पण केले. तेंव्हापासून दोन उद्दिष्टे त्यांनी आपल्या डोळयासमोर ठेवली होती. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी जे विविध मार्ग अनुसरणे शक्य आहे, त्यामध्ये अहिंसेचा मार्ग हा श्रेष्ठ व अधिक परिणामकारक आहे. हे सिध्द करण्याचे त्यांचे एक उद्दिष्ट होते. स्वातंत्र्य हस्तगत करण्यासाठी हिंदू–मुसलमान ऐक्य आवश्यक आहे, अशी त्यांची

धारणा होती. हे ऐक्य घडवून आणणे हे त्यांचे दुसरे उद्दिष्ट होते. आपल्या उदाहरणाने अहिंसेचा संदेश हिंदुस्तान युध्दग्रस्त जगाला देईल हे गांधींचे स्वप्न होते.

१९४६ च्या अखेरीस गांधींच्या स्वप्नाचे तुकडे–तुकडे झाले. हिंदू–मुसलमान एकमेकांच्या नरडीचा घोट घेण्यासाठी आतुर झाले होते. कलकत्ता, नोआखली, बिहार, दिल्ली येथे जाळपोळ, कत्तली, स्त्रियांचे अपहरण व सक्तीचे धर्मांतर या गोष्टी मोठया प्रमाणात घडून आल्या. गांधींच्या कानावर सर्व गोष्टी गेल्यावर ते स्वस्थ राहतील हे शक्यच नव्हते. ते प्रांतोप्रांती फिरून दंगे शमविण्याचे प्रयत्न करू लागले.

महात्मा गांधींनी हिंदू–मुस्लिम दंगे शमविण्यासाठी नैतिक आणि अध्यात्मिक मार्गांचा अवलंब केला. भारतातील जातीय हिंसेची, गोहत्या आणि मशिदीसमोर संगीत वाजविणे ही त्याची उगमस्थाने आहेत, असे गांधींजींचे मत होते. दंगे शविण्यासाठी कोणतीही उपाययोजना करण्याअगोदर प्रत्यक्ष घटनास्थळी जावून तेथील परिस्थितीचे अवलोकन करण्यावर गांधीजींचा भर होता. रास्त हक्कांसाठी नोआखलीच्या हिंदू रहिवाशांनी सामंजस्याने पण निग्रहाने सरकारशी झगडावे अशी त्यांची भूमिका पदोपदी स्पष्ट होते. सक्तीने धर्मांतर घडवून आणण्याचा नोआखलीत प्रयत्न झाला होता. हिंदूंनी एकतर पळ काढला किंवा लाचारीने धर्मांतर पत्करले. स्त्रियांची विटंबना थांबविण्यासाठी प्राण न देता बहुतेक पुरूषांनी पळ काढला. गांधींना या गोष्टीचे तीव्र दुःख झाले. उजळ माथ्याने आपल्या धर्माचे पालन करण्याची हिंमत हिंदूंच्या ठिकाणी निर्माण करण्यावर त्यांचा भर होता. स्त्रियांनी पुरूषांवर अवलंबून न राहता निर्भय बनावे, आपण अबला नसून वीरांगना आहोत ही शिकवण दे देत होते. स्थानिक

मुसलमान रहिवाशांची मनधरणी न करता, सुरक्षित जीवनाची भीक त्यांनी घालावी यासाठी पदर पसरत नव्हते. तर आपल्या विचारात व वागणुकीत सुधारणा करावी, अस्पृश्यतेचा कलंक धुवून काढावा. जी साधनसंपत्ती शोषण करून संपादन केलेली असेल तिचा त्याग करावा आणि हिंदूंनी आपल्या मुसलमान बांधवांबरोबर ताठ मानाने उभे राहावे, अशी दुहेरी शिकवण महात्मा गांधी देत होते. ऐक्यासाठी लोकांनी स्वतः होवून हात पुढे केले पाहिजेत. नष्ट केलेली संपत्ती मुसलमानांनी पुन्हा निर्माण करण्यात हातभार लावावा व गाव सोडून गेलेल्या हिंदूंना पुन्हा गावात सन्मानाने आणावे, अशी गांधीजींची इच्छा होती.

महात्मा गांधींना मुसलमानांना प्रेमाने जिंकून घ्यावयाचे होते. यासाठी त्यांचे न्हदय परिवर्तन घडवून आणणे महात्मा गांधींना आवश्कय वाटत होते. नोआखलीत बंगाली भाषिक खेडुतांमध्ये काम करताना त्यांनी आपल्या सर्व सहकाऱ्यांना नम्रतेने वागण्याचा सल्ला दिला. खेडूत देतील तेवढयावरच जीवन चालवून शांतता राखण्याचे प्रयत्न गांधीजी करीत होते. प्रेम व अहिंसा यांचे श्रेष्ठतव निर्विवादपणे सिध्द करण्यावर गांधीजींचा भर होता. दररोज प्रार्थना सभेत लोकांनाते शुध्द आचरणाचे मार्ग सांगत हाते. व्यक्तिवादावर गांधीजींची उत्कट श्रध्दा होती. बेताल भावनांच्या जागी विवेकाची प्रतिष्ठापना करणाऱ्या लोकांना युध्दाऐवजी शांततेच्या मार्गावर आणण्याचा त्यांचा एकाकी प्रयत्न होता. शांतता स्थापन करण्याची जबाबदारी लोकनियुक्त मंत्र्यांची आहे. बंगालमधील प्रत्येक खुनाची जबाबदारी मंत्र्यांवर आहे अशी ठाम भूमिका ते मांडत होते.

न्यायाच्या धर्मकाटयावर न बसणारी गोष्ट गांधींनी कधीही मान्य केली नाही. ब्रिटीश सत्तेला मध्ये न घालता हिंदू-मुसलमानांनी आपापसात काय ते ठरवावे. हे गांधींच्या सर्व प्रयत्नांचे व विचारांचे मध्यवर्ती सूत्र होते.

हिंदू–मुसलमानांमध्ये यादवी झाली तरी त्या यादवीत घडून येणाऱ्या जीवित हानीची किंमत देणे परवडेल, पण ब्रिटीश सत्तेकडून स्वराज्याचे दान घ्यायला नको असे गांधी सतत म्हणत होते. सौहार्द प्रस्थापित होवू शकला नाही, तर हिंदुस्तान किंवा पाकिस्तान यांचे स्वतंत्र होणे व्यर्थच आहे, परस्पर कलहाने दुभंगलेल्या आणि पाशवी अत्याचाराने बरबटलेल्या भारताच्या नशिबी मग प्रत्यक्षात गुलामीच येईल असेही त्यांचे मत होते.

प्रत्यक्ष दंग्यांच्या ठिकाणी उपस्थित राहून गांधींजी लोकांना नैतिक व अध्यात्मिक बलावर एकत्र आणण्याचे प्रयत्न करीत होते. दंगली आटोक्यात आल्या नाही तर गांधीजी स्वतःशीच प्रश्न करीत असत की, 'माझी अहिंसा फसली का? २६ वर्षांच्या कार्यांचा इच्छित परिणाम हाच आहे का?' परंतु आपली अहिंसक वृत्ती त्यांनी शेवटपर्यंत सोडली नाही. दंगे शमविण्यासाठी शेवटचा मार्ग म्हणून गांधींनी उपोषणाच्या मार्गाचा अवलंब केला. कलकत्ता, बिहार, दिल्लीमध्ये या तीनही ठिकाणी त्यांनी उपोषण जातीय सलोख्यासाठी केले. कॉंग्रेस संघटनेच्या चौकटीत राहून, तिच्या मर्यादा पत्करून अखेरपर्यंत काम केले. आपला निष्ठा व भूमिका कॉंग्रेसने स्वीकाराव्या हा आग्रह त्यांनी त्यामुळे अनेक प्रसंगी सोडला. सत्याग्रही हा अहिंसकच असलाच पाहिजे! ही गांधीजींची ठाम भूमिका होती. नेहमी दुर्बलांची बाजू घ्यावी हा त्यांचा स्वभावधर्म होता.

जमातवादी दंगे शमविण्यासाठी गांधी प्रयत्न करीत असताना काही सकातरात्मक घटना घडत होत्या. ऑगस्ट महिन्यात हिंदू–मुसलमानांचे दंगे भडकले असताना गांधीजी तेथे जावून राहिले. त्यांचा एकंदर परिस्थितीवर जादुसारखा परिणाम झाला. तेथील हिंदू व मुसलमान बंधुभावाने एकमेकांस

मिठया मारत होते. शांतता स्थापित झाल्याचा भास होत होता. शस्त्राच्या आधाराने हल्ले करणारे हल्लेखोरसुध्दा सर्व शस्त्रे गांधींसमोर ठाकून पुन्हा त्या प्रकारचे कृत्य न करण्याचे शब्द देत होते व आपल्या चुकीच्या कृत्याबद्दल पश्चाताप व्यक्त करीत हाते. जेथे गांधी प्रत्यक्ष उपस्थित होते तेथील परिस्थिती निवळत होती. म्हणजे ऐक्य असो वा नसो पण लोक गांधींच्या व्यक्तिगत थोरवीच्या प्रभावामुळे प्रत्यक्ष हिंसा करावयाचे थांबवित. पण खुद्द गांधींना मात्र आपण यशस्वी झालो आहोत असे अखेरपर्यंत वाटले नाही. कारण प्रत्यक्ष शांतता दिसत असली तरी लोकांमध्ये असुरक्षिततेची भावना कायम होती. गांधीजी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी गेल्यावर पुन्हा नव्याने दंगे होत होते. कारण दंगेखोरी करणारे सुप्त अवस्थेत क्रियाशील होते. त्यामुळे हिंदू–मुस्लिम दंगे पूर्णतः थांबविण्यात गांधींना यश आले नाही.

दंगली शमविण्यासाठी महात्मा गांधींनी वेगवेगळया प्रयोगांचा वापर केला.

१. सर्व धर्मातील वैचारिक ऐक्याची भावना त्यांनी सार्वधर्मीय प्रार्थनेच्या द्वारा लोकांच्या मनात बिंबवण्याचा प्रयत्न केला. सर्वभूतैश्याचा आध्यात्मिक संदेश दिला.

२. पदयात्रा करून लोकांच्या मनातील भीती काढून त्यात आत्मविश्वास व सुरक्षिततेची भावना निर्माण केली.

३. धर्म हा राष्ट्राचा आधार बनू शकत नाही व हिंदू व मुसलमान हे बंधू असून ते जन्मजात शत्रू नाहीत हे त्यांनी सांगितले.

४. जातीय ऐक्य व मैत्रीभावना वैरापेक्षा महत्त्वाची असून हिंसा, सूड व प्रतिशोध बिनउपयोगाचा आहे हे सांगितले.

५. शांतता फेऱ्या प्रभातफेऱ्या काढून दंगलग्रस्त भागात आत्मविश्वास निर्माण केला, वातावरण बदलवले.

६. द्वेषाला प्रेमभावनेने उत्तर दिले व व्यक्तिमत्त्वाच्या जोरावर हिंसेवर विजय मिळविला.

७. उपोषण करून आत्मक्लेशाचा मार्ग स्वीकारला आणि त्याद्वारा हृदय परिवर्तन साध्य केले.

८. सभा–मोर्चे, उपोषण, पदयात्रा, प्रार्थना याद्वारा महात्मा गांधींनी वातावरणात बदल केला. त्यामुळे पेटलेला पूर्व बंगला शांत झाला. त्यामुळे आज ही बांगलादेशात एक कोटी पेक्षा जास्त हिंदु राहतात.

९. घबराटीवर आधारलेल्या अफवा स्वंयसेवकांनी पसरवू नयेत.

महात्मा गांधींनी हिंदू–मुस्लिम ऐक्यासाठी ज्याप्रकारे नैतिक, आध्यात्मिक भूमिका स्वीकारली होती ती हिंदू–मुस्लिम प्रश्न सोडविण्यास पुरेशी सार्थक ठरली नाही. कारण हिंदू–मुस्लिम प्रश्न हा केवळ गांधी समजत त्याप्रमाणे धर्मांच्या चुकीच्या समजुतीने निर्माण झालेला नसून त्यास आर्थिक, राजकीय सत्तेचा ही तर्कसंगत आधार होता. या दृष्टिकोनातून या समस्येकडे बघण्यास गांधींना अपयश आले. दुसरी गोष्ट गांधीजींनी उपोषणाच्या माध्यमातून स्वतः आत्मक्लेश सहन करून शांतता प्रस्थापनेचा जो मार्ग अवलंबिला होता तो त्यावेळच्या परिस्थितीस अव्यवहार्य ठरत होता. कारण अशाप्रकारे लोकांना सक्तीने ऐक्य करण्याने अंशिक शांतता निर्माण होवू शकते. पण पूर्ण शांतता निर्माण होवू शकत नाही. हिंसेपेक्षा अहिंसेच्या मार्गाने संघर्ष करावा आणि उत्तर शोधावे हा श्रेष्ठ व परिणामकारक पर्याय आहे असा गांधींचा सिध्दांत होत. लोक जोवर अटीतटीला येत नाहीत तोवर अहिंसा ठीक आहे, पण एखादी गोष्ट हिंसक

थराला पोहोचल्यावर अहिंसा कमजोर पडते. अमानुष हिंसेला प्रवृत्त झालेल्या माणसाकडून सद्भावनेची अपेक्षा करणे त्यावेळी व्यर्थ होते. स्वातंत्र्यकाळात हिंदू–मुस्लिम प्रश्नाला धर्माचा आधार असला तरी प्रत्यक्षात त्यामागे राजकीय सत्ता व आर्थिक सत्ता या गोष्टी प्रबल होत्या. त्याद्वारेच प्रश्नांची सोडवणूक करणे आवश्यक होते. पण गांधीजी काही प्रमाणात या परिप्रेक्ष्यातून हिंदू–मुस्लिम प्रश्नाकडे पाहण्यास असमर्थ ठरले, असे वाटते. लाखो हिंदू लोकांवर मुस्लिमांमुळे दुःख व संकट ओढवले होते, त्यांनादेखील न्यायने वागावे असा संदेश गांधीजी देत होतो. तो लोकांना पटत नव्हता. नोआखलीतील अल्पसंख्यांक हिंदूंना मुस्लिमांबरोबर राहण्याचा सल्ला गांधीजींनी दिला. त्यामुळे आजही बांगला देशात शे. १० टक्के लोक हिंदू आहेत. ज्या कॉंग्रेस संघटनेला महात्मा गांधींनी अखिल भारतीय स्वरूप देवून तळागाळातील जनमानसात बीज पेरले होते त्याच कॉंग्रेस संघटनेतील काही आपमतलबी पुढाऱ्यांनी शेवटी–शेवटी महात्मा गांधींच्या विचारांचा अस्वीकार केला.

असे असले तरी हिंदु–मुस्लिम संघर्षासंबंधी त्यांनी अतिसुलभीकृत भूमिका घेतल्यामुळे कदाचित हा संघर्ष पूर्णपणे मिटविण्यास गांधीजी अपयशी ठरले असावेत. या समस्येकडे महात्मा गांधींनी ऐतिहासिक, अध्यात्मिक व नैतिक परिप्रेक्ष्यातून पाहिले. महात्मा गांधींनी वेगवेगळया प्रयोगाच्या माध्यमातनू हिंदू–मुस्लिम या दोन जातीतील धार्मिक तेढ मिटविण्यात फार मोठे यश संपादन केले. किंबहुना प्रसंगी आपल्या प्राणांची पर्वा न करता प्रसंगानुरूप प्रत्यक्ष कृती करून या दोन समूहांना त्यांनी शांततेचे आवाहन केले. कोणत्याही शस्त्रास्त्रांचा वापर न करता त्यांनी अहिसंक मार्गाने लढा दिला व त्यात ते यशस्वी झाले. शेवटी असेच म्हणावे लागेल की, राजकारणाला अध्यात्माचा व धर्मकारणाचा रंग

देणारे महात्मा गांधी केवळ धर्मनिरपेक्ष राजकारणीच नव्हते तर राजकारणातील संत होते. हे त्रिकालाबाधित सत्य नाकारण्यास काहीच हशील नाही.

## समकालीन महत्त्व :

या संबंधात प्रख्यात विचारवंत श्री. वसंत पळशीकर म्हणतात की, "मानवामधील संबंध सहकार्याचे, न्यायाचे व प्रेमाचे असणे हे सुसंस्कृतीचे लक्षण म्हणता येईल ही भूमिका मान्य असणाऱ्या, असे सुसंस्कृत मानव जीवन निर्माण करण्यात रस असलेल्या सर्वांना गांधींच्या प्रयोगाची दखल घेतली पाहिजे. नोआखलीतल्या गांधींच्या व्यापक सामाजिक प्रयोगाचे वैशिष्टये असे की, एका अगदी टोकाच्या परिस्थितीत केलेला तो प्रयोग होता. हिंदू रहिवाश्यांवर पध्दतीशीर हल्ले करून त्यांना नोआखलीतून हाकलून लावण्याचा, हिंदूंचे मोठया प्रमाणावर धर्मांतर घडवून आणण्याचा, बायका–मुली भ्रष्टविण्याचा उद्योग मुसलमानांनी केला होता. ज्यांना पळून जाणे शक्य होते, ते पळून गेले होते, ज्यांना ते शक्य नव्हते, ते भयमीत अवस्थेत जीव मुठीत धरून लाचारीने राहत होते. नोआखलीत हिंदू व मुसलमान यांच्यात परस्परांविषयी पूर्ण अविश्वास व द्वेष होता. भरीला हिंदूंच्या मनाचा ताबा भीतीने घेतला होता. मुस्लिम पुढाऱ्यांच्या प्रचारामुळे नोआखलीत मुसलमानांमध्ये गांधींचे वनज शुन्य होते, इतकेच नव्हे तर गांधींविषयी त्यांची मने संशयाने, अविश्वासाने व शत्रुत्वाच्या भावनेने ओतप्रोत भरलेली होती. नोआखलीत गांधींना दोन गोष्टी साधावयाच्या होत्या. हिंदूंच्या मनातील भीती आणि लाचारी त्यांना निपटून काढावयाची होती; आपले न्याय हक्क अबाधित राखून सन्मानाने जगण्याचे म्हणजेच शौर्याची शिकवण त्यांना दयावयाची होती; थोडक्यात, शूराची अहिंसा शिकवावयाची होती. दुसऱ्या बाजूला मुसलमानांना प्रेमाने जिंकून घ्यावयाचे होते; हिंदू बांधवांचा आदर

करावा, त्यांना बंधुभावाने वागवावे यासाठी त्यांच्या हृदय परिवर्तन घडवून आणावयाचे होते. ही दोन उद्दिष्टये साध्य करण्यात त्यांना यश आले. तर सामाजिक परिवर्तनाची प्रभावी साधने व मार्ग म्हणून प्रेम व अहिंसा यांचे श्रेष्ठत्व निर्विवादपणे सिध्द होणार होते. लोकांच्या मनाची पर्वा न करता त्यांचे वागणे दंडुक्याच्या जोरावर आपणांस हवे तसे वाकविणे ज्यांना पुरेसे व योग्य वाटते त्यांना गांधींच्या प्रयोगाचे आकर्षण कदाचित वाटणार नाही. पण माणसाची अप्रतिष्ठा न करता, म्हणजेच त्यांच्यात परिवर्तन घडवनू आणून, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीचा भेद करण्यात रस असलेल्यांना गांधींचा प्रयोग महत्त्वाचा वाटला पाहिजे."(१)

आज सबंध भारतामध्येच नव्हे तर जगामध्येसुध्दा हिंसक दंगली, जाळपोळ, अन्याय, अत्याचार यांचे प्रचंड थैमान चालू असलेले आपणांस दिसून येते. याची सोडवणूक करण्यासाठी आपणांस परत एकदा महात्मा गांधीजींच्या अहिंसक मार्गाचा अवलंब करणे अपरिहार्य आहे. हिंदू–मुस्लिम ऐक्यासाठीच नव्हे तर इतरही अनेक समस्यांसाठी गांधीजींचे विचार रामबाण औषध असल्याचे सिध्द होत गेले. आजही जमातवादी संघर्ष सोडविण्यासाठी गांधीजींचे विचार स्वीकारणे आवश्यक आहे. त्याचे काही समकालीन महत्त्व आपल्याला पुढीलप्रमाणे सांगता येईल –

१. धार्मिक व जातीय वैरभावना आणि हिंसाचाराचे ज्यांना शमन करावयाचे आहे. त्यांना गांधीजींचे विचार कालसुसंगत वाटतात.

२. आमूलाग्र परिवर्तनासाठी जनमानस जागृत व संघटित करू पाहणाऱ्यांचा एक वर्ग आपल्या देशांत आहे. त्यांना गांधी विचाराने हिंदू–मुस्लिम ऐक्य शक्य होईल असे वाटते.

३. अहिंसा हे तत्त्व महात्मा गांधींनी दहशतवादाला शोधून काढलेला पर्याय आहे.

४. सत्याग्रही अहिंसक असलाच पाहिजे! हा गांधी विचार कालसुसंगत आहे.

५. सर्व धर्मांचा नैतिक व अध्यात्मिक समन्वय हे तत्त्व स्वीकारल्यास जातीय ऐक्य दृष्टीक्षेपात येण्यास मदत होईल.

६. ज्यांना दारिद्र्य, विषमता, बेरोजगारी इ. मुलभूत प्रश्न सोडवावेसे वाटतात. अशा व्यक्ती व संस्थांना गांधींचा विचार पटू लागला आहे.

७. पर्यावरणाचा ऱ्हास ज्यांना थांबवायचा आहे. देश उजाड बनत चालल्याबद्दल ज्यांना चिंता वाटते. अशांना गांधींचे विचार स्वीकार्य वाटतात.

८. महात्मा गांधीजींच्या सर्व विचारांचे परिशीलन केल्यानंतर निष्कर्षांती त्यांचे संबंध विचार समस्त मानवतेकडे व समरसतेकडे जाणारे होते. यात तीळ मात्र शंका नाही.

प्रा. बोस लिहितात, "गांधीजींची विवेकाची शिकवण भारताने मनावर घेण्याचा दिवस कदाचित अद्याप आला नसेल. गांधीजींनी आपल्या जीवनाने आणि त्याहीपेक्षा मृत्यूने व्यक्तीचे अग्रगण्यत्त्व सार्थ केले. भौतिक सुखासाठी व्यक्तीला यंत्रातला खिळा बनवून टाकणारे आजचे जग व्यक्तीला परत एकवार, तिचा जन्मसिध्द हक्क असलेले हे अग्रगण्यत्व देण्यापूर्वी खूप काळ चालढकल करील हे शक्य आहे, पण गांधींना जन्म देवून ही भारतभूमी धन्य झाली आहे. युगानयुगे मानवजातीचा वारसा समृध्द करणारे तेज त्यांच्या जीवनाला देणारा मृत्यूचा प्रहार करून ती कदाचित आणखी एक वाट धन्य झाली आहे."[२]

समारोप :

भारतातील हिंदू – मुस्लिम प्रश्न हा एक गंभीर प्रश्न होता आणि या प्रश्नाची सोडवणूक करण्याचे वेगवेगळे मार्ग सुचविण्यात आले. त्यातील पहिला मार्ग हा हिंसेचा आणि बळाचा होता. हिंसेचा, दंगलीचा वापर करून हिंदूंनी मुसलमानांना आणि मुसलमानांनी हिंदूंना आपल्या वर्चस्वाखाली आणावे असा हा मार्ग सांगत होता. या मार्गाचा पुरस्कार करणाऱ्यांत सावरकर, कडव्या मुस्लिम जमातवाद्यांचा समावेश होतो. दुसरा मार्ग हा कायदेशीररित्या देशाचे विभाजन करून सत्ता वाटप करण्याचा होता. मुस्लिम लीगने सातत्याने या मार्गाचा पुरस्कार केला. त्याला ब्रिटीश साम्राज्यवाद्यांनी पाठींबा दिला होता. तिसरा मार्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या 'थॉट्स ऑन पाकिस्तान' या ग्रंथात सुचविलेला होता. भारतात जर हिंदू आणि मुसलमान जर एकत्र राहू शकत नसतील तर भारताचे विभाजन व्हावे आणि दोन्ही जातींतील वांशिक संघर्ष टाळण्यासाठी लोकसंख्येची अदलाबदल व्हावी. सर्व हिंदूंनी भारतात यावे व सर्व मुसलमानांनी पाकिस्तानात जावे.[3]

हिंदु – मुस्लिम प्रश्न सोडविण्यासाठी वरील तिन्ही मार्ग महात्मा गांधींना मान्य नव्हते, कारण त्यांचे असे मत होते की, हिंदू–मुस्लिमांमध्ये धार्मिक बाबतीत बदल असले तरी ते एकाच वांशिक आणि सांस्कृतिक परंपरेचे वारसदार आहेत. समाजा–समाजामधील आणि राष्ट्रा–राष्ट्रामधील संघर्ष सोडवण्यासाठी हिंसा हा मार्ग नाही. इतिहासाने हा मार्ग कुचकामाचा ठरविला आहे. भारत हे हिंदू आणि मुसलमान या दोघांचे राष्ट्र आहे. हिंदू, मुस्लिम हे दोन्ही धर्म सर्वधर्म सहिष्णुतेचा पुरस्कार करतात आणि माणसां–माणसांतील हे जे कृत्रिम संघर्ष आहेत ते आपण परस्पर सहकार्याने आणि सामंजस्याने सोडवू शकतो. मुस्लिम लीगच्या

राजकारणामुळे जमातवादी भावना दीप्त झाली आहे. त्यामुळे माणसां—माणसांत पशुत्व जागे झाले आहे. माणसा—माणसांतील हे पशुत्व जास्त हिंसक पशुत्त्वाने नष्ट होत नाही तर त्यामध्ये माणुसकीचा अंश आणणे, प्रेम, अहिंसा यांच्याद्वारे हृदयपरिवर्तन करणे आवश्यक असते.

फाळणीच्या काळामध्ये भारतामध्ये जे विध्वसंक जातीय दंगे झाले त्या दंग्यांवर मात करण्याचे प्रयत्न गांधींनी केले. स्वतःची आत्मशक्ती त्यांनी पणाला लावली. हिंसेच्या ज्वालेमध्ये पेटलेल्या बंगाल प्रांतामध्ये गांधींमुळे मोठया प्रमाणात शांतता निर्माण झाली. त्यावेळी मौंटबॅटन म्हणाले, "पंजाबमध्ये एक डिव्हिजन ब्रिटीश सैन्य आहे. तरीही शांतता स्थापन झाली नाही, परंतु बंगालमध्ये वन मॅन बॉन्ड्री फोर्स कार्य करते आहे. आणि या एका माणसाने एका डिव्हीजन सैन्यांपेक्षा काम जास्त यशस्वीरित्या केले आहे." महात्मा गांधींनी प्रयत्न करून बऱ्याच प्रमाणात शांतता त्या भागात निर्माण केली. लोकांनी स्थलांतर करू नये असे गांधीजींचे मत होते. त्यामुळे आजही बांगलादेश मध्ये शेकडा १० टक्के हिंदू राहत आहेत. पंजाबमध्ये मात्र तसे नाही. हिंसा आणि द्वेष यांनी ग्रस्त असलेल्या समाजामध्ये गांधींना पूर्ण यश मिळाले नाही हे जरी खरे असले तरी अशा परिस्थितीत गांधींना मिळालेले यश आपल्याला कमी लेखता येणार नाही. वरील तीन मार्गांचा विचार केला तर गांधीजींचा हा मार्ग जास्त श्रेयस्कर वाटतो. कारण इतर मार्गांनी हा प्रश्न सुटणार नाही, हे स्पष्ट दिसते. म्हणून गांधीजींनी प्रेम, अहिंसा आणि सत्य याचा पुरस्कार करून संदेश दिला की, आता भारत स्वतंत्र झाला आहे, आणि मला सत्याचे स्पष्टपणे दर्शन होत आहे. पारतंत्र्याचे दडपण निघाल्या बरोबर दुरितांच्या सर्व शक्ती पृष्ठभागावर आल्या आहेत. हे एक चांगले चिन्ह आहे हे उघड आहे. पण सगळया शिवशक्ती संघटित करून

एक महान राष्ट्र बनवायचे बाकी आहे. असे महान राष्ट्र की जे माणसांतले तंटे, मग ते देशांतर्गत दोन गटांतले असोत किंवा देशामधले असोत, सोडवण्यासाठी पारंपारिक हिंसक पध्दती वापरणार नाही. अजूनही भारत आजच्या या आव्हानाला पुरेशी उंची गाठेल, आणि दोन नवीन राष्ट्रांचा अवतार हा जगाला संकटाप्रमाणे न ठरता उरलेल्या सगळ्या मानव जातीला वरदान ठरू शकतो, असे जगाला सिध्द करून दाखविन, अशी माझी श्रध्दा आहे. भारताचे स्वातंत्र्य खरोखरच सार्थकी लागायचं असेल तर, गटागटातले झगडे मिटवता येतील इतके अहिंसेचे शस्त्र परिपूर्ण बनविणे हे स्वतंत्र भारताचे कर्तव्य आहे.

# संदर्भग्रंथ सूची


१ बोस, निर्मलकुमार –'माय डे वुईथ महात्मा गांधी', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८३, पृ. क. ७.

२ उक्त – पृ. क. २२३.

३ डॉ. देशपांडे स. ह. – सावरकर ते भाजप : हिंदुत्वविचारांचा चिकित्सक आलेख.